**Samana August 26, 2010**

# तंत्रज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धेत आर्मी पब्लिक स्कूलची बाजी

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी) - शालेय विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाची आवड निर्माण व्हावी, यासाठी टाटा कन्सल्टन्सीतर्फे घेण्यात आलेल्या तंत्रज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धेत आर्मी पब्लिक स्कूलने बाजी मारली. यामुळे या शाळेला आता राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेत पुण्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळणार आहे.

शहर आणि परिसरातील ७० शाळांमधील सुमारे सहाशे विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. आर्मी पब्लिक स्कूलच्या ग्यानेंद्र मिश्रा आणि एस. ऋषिराज यांना यावेळी आयपॅड आणि डिजिटल कॅमेरा देऊन गौरविण्यात आले. मॉडर्न विद्यालयाच्या तनय चांदकर आणि निषाद डावखरे यांनी उपविजेतेपद पटकाविले. पुण्याच्या तंत्रज्ञान विभागप्रमुख शिरीष गोडबोले, एस. सहस्रबुद्धे, अरविंद पाध्ये, हॅरिक विन यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

पुण्यासह देशातील अकरा मोठ्या शहरांमध्ये ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. या सर्व शहरांच्या प्रतिनिधींची अंतिम स्पर्धा डिसेंबर महिन्यात होणार आहे.